# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. २७/०५/२००५

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक २७/०५/२००५ रोजी सभा सुचना क्र. ०४ दि. २४/०५/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी श्री. हॅरल बोर्जीस हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | पिठासिन अधिकारी |
| २) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |
| ३) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ४) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ५) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| ६) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |
| ७) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ८) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| ९) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| १०) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन मधुकर पाटील | सभापती |
| २) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सदस्य |
| ३) | श्री. मिलन गोविंद पाटील | सदस्य |
| ४) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |

**प्र. सचिव :-**

सन्मा. सदस्य आजच्या सभेचा कोरम पुर्ण झालेला आहे आणि सभापती साहेब हे आजच्या सभेला उपस्थित नसल्यामुळे उपस्थित सदस्यांमधुन पीठासीन अधिकाऱ्याची निवड करण्यांत आली.

**अशोक पाटील :-**

सभापती साहेबांची तब्येत बरोबर नाही का, रजेवर गेलेले आहेत का?

**प्र. सचिव :-**

तसे लेखी काहीही कळविलेले नाही. त्यांचा रजेचा आलेला नाही.

**अशोक पाटील :-**

आपण सभा कशी काय लावली.

**प्र. सचिव :-**

सभा लावायची म्हणुन तीन दिवस अगोदरच अजेन्डा काढण्यांत आला होता.

**रिटा शाह :-**

सन्मा. सदस्य हॅरल बोर्जिस ह्यांची आजच्या सभेकरीता पीठासीन अधिकारी म्हणुन निवड करावी.

**सुर्यकांत भोईर :-**

अनुमोदन आहे.

**ठराव क्र. २० :-**

सन्मा. सदस्य श्री. हॅरल बोर्जीस ह्यांची पिठासिन अधिकारी म्हणून निवड करावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्रीम. रिटा शाह.** **अनुमोदन :- श्री. सुर्यकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. सचिव :-**

सन्मा. सदस्य हॅरल बोर्जिस ह्यांनी पीठासीन अधिका-यांच्यापदी स्थान ग्रहण करावे.

**हॅरल बोर्जिस (प्र. सभापती) :-**

सर्व सन्मा. उपस्थित सदस्य, उपायुक्त (मु.) सो., व सर्व खात्याचे अधिकारी वर्ग आजच्या ह्या स्थायी समितीच्या सभेसाठी पीठासीन अधिकारी म्हणुन आपण सर्वानुमते माझी निवड केली. त्याबद्दल मी आपला आभारी आहे. आपल्याला ज्ञात असेल की, सन्मा. विद्यमान सभापती साहेबांचे पूर्वनियोजित दौरा असल्यामुळे आजच्या सभेला उपस्थित राहु शकले नाही. आजच्या स्थायी समितीच्या सभेकरीता मी सर्वांचे स्वागत करतो आणि सचिवांना आजची ही सभा सुरु करण्याचे आदेश देतो.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १८ चे वाचन केले.)

**रिटा शाह :-**

मागच्या सभेत सदर विषयाचा गोषवारा नसल्यामुळे हा विषय पुढच्या सभेत घेण्याचे ठरले. आज आपण आम्हाला अटीशर्ती दिलेली आहे. आम्हाला असे वाटते की ह्याच्यावर अभ्यास करा. आपण आम्हाला अर्धा तास तरी द्या.

**जोजफ घोन्सालवीस :-**

गेल्यावेळेच्या अटीशर्तीत आणि आज दिलेल्या अटीशर्तीत फरक आहे ना! तर जे जुन्या अटीशर्ती आहेत त्याही द्याव्यात. आपण आम्हाला अभ्यास करायला अर्धा तास द्यावा.

**प्रेमनाथ पाटील :-**

ज्या जुन्या अटीशर्ती आहेत. तेही आम्हाला देण्यांत यावे.

**प्रभात पाटील :-**

मागच्या वेळेच्या अटीशर्ती आपण टॅली करुन बघु या, की मागच्या अटीशर्ती आणि आताच्या अटीशर्तीत काय फरक आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

अटीशर्तीची प्रत सन्मा. सदस्यापर्यंत पोहोचलेली असेल.

**प्रेमनाथ पाटील :-**

मागील अटीशर्तीची प्रत मिळाली असती तर बरे झाले असते.

**रिटा शाह :-**

सचिव साहेब, आपण वेळेवर गोषवारा देता, अटीशर्ती वेळेवर देता, त्याचा अर्थ काय? ते आम्ही वाचणार कधी आणि त्याच्यावर आपल्याला काय निर्णय देणार?

**हॅरल बोर्जिस (प्र. सभापती) :-**

आपण जो प्रस्ताव मांडला आहे. त्याकरीता अटीशर्ती वाचण्यासाठी तुम्हाला दहा मिनिटाचा अवधी देऊ. मिनव्हाईल दहा मिनिटासाठी सभा तहकुब ठेवु. तुम्ही वाचा आणि निर्णय द्या.

**प्रभात पाटील/ रिटा शाह/ जोजफ घोन्सालवीस :-**

ह्या अटीशर्ती सोबत मागच्या अटीशर्तीही द्या.

**हॅरल बोर्जिस (प्र. सभापती) :-**

ह्या ज्या अटीशर्ती आहेत. त्याच्यामध्ये मागच्या वेळेच्या ज्या अटीशर्ती जकातीच्या संदर्भामध्ये होत्या. त्याच अटीशर्तीचा ह्यामध्ये उल्लेख आहे.

**रिटा शाह :-**

तरीही मागच्या अटीशर्तीची कॉपी द्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

आम्ही या सभेत नविन असल्यामुळे मागच्यावेळी काय अटीशर्तीत होते ते आम्हाला माहिती नाही.

**प्रभात पाटील :-**

सभापती साहेब, जर एवढ्या कॉपी देणे शक्य नसेल तर मागच्या ज्या अटीशर्ती आहेत त्याच वाचन करु या म्हणजे त्यापैकी किती अटीशर्ती ह्या अटीशर्तीत आले आहे ते आपल्याला कळेल.

**प्रेमनाथ पाटील :-**

सचिव साहेब, ह्या अटीशर्ती इंग्रजीमध्ये आहे का, मराठी मध्ये आहे?

**प्र. सचिव :-**

अटीशर्ती इंग्रजीमध्ये आहे.

(सभागृहात जकातीच्या अटीशर्तीचे वाचन करण्यांत आले.)

**रिटा शाह :-**

हे येथे मराठीमध्ये आहे आणि आपण वाचता ते इंग्रजीमध्ये आहे. मराठी शब्दात आणि इंग्रजी शब्दात भरपुर फरक येईल.

**हॅरल बोर्जिस (प्र. सभापती) :-**

सन्मा. सदस्य ज्या पहिल्या सात अटीशर्ती आहेत, ह्या जुन्या अटीशर्ती आहे. त्याचे मराठीमध्ये भाषांतर करुन आपल्याला दिले आहे.

**रिटा शाह :-**

तुम्ही ते ऑफीशियली द्या. वाचलेले असे चालणार नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपण आम्हाला ऑफिशियली प्रत द्या. म्हणजे आम्हाला समजेल ना!

**प्रभात पाटील :-**

मराठीत ते वाचुन काढा. नाहीतर त्याचे भाषांतर करा.

**जोजफ घोन्सालवीस :-**

नंतर द्या. एक सभा पुढे जाऊ द्या.

**हॅरल बोर्जिस (प्र. सभापती) :-**

ह्या अटीशर्तीचेच मराठीत भाषांतर करुन आपल्या समोर दिले आहे.

**रिटा शाह :-**

मागच्या अटीशर्ती वेगळ्या होत्या आणि आताच्या अटीशर्ती वेगळ्या आहेत.

**अशोक पाटील :-**

लेखापाल साहेबांना सांगा ते आपल्याला त्याचे मराठीत भाषांतर करुन सांगतील.

**रिटा शाह :-**

शासनाचा आदेश आहे, मराठीत कारभार करायचा आणि आपण येथे इंग्लीशमध्ये का चालवतो?

**गजानन भोईर :-**

जसे ह्या अटीशर्ती मराठीत दिलेल्या आहेत. तसेच जुन्या अटीशर्तीही मराठीत द्यायला पाहिजे होते.

**रिटा शाह :-**

हवे असल्यास आपण सभेनंतर विषय घ्या.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मराठीत भाषांतर करुन पुढच्या सभेत विषय घ्या. सभा उद्या परवा बोलवा. आपल्याला ह्या ज्या अटीशर्ती दिलेल्या आहेत. त्या मराठीत भाषांतर केलेल्या आहेत. ज्या पहिल्या सात अटी आहेत. त्याच अटी मराठीमध्ये भाषांतर करुन त्याची कॉपी देण्यांत आलेली आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपण आम्हाला ऑफिशियली द्या ना, कि ह्या जुन्या अटी अशा होत्या आणि आता असे करण्यांत आलेले आहे.

**अशोक पाटील :-**

पहिल्या सात अटी जे इंग्रजीमध्ये होते ते मराठीत भाषांतर करुन दिलेले आहे आणि त्याच्या पुढच्या अटी...

**हॅरल बोर्जिस (प्र. सभापती) :-**

पुढच्या अटी ॲडीशन आहेत.

**जोजफ घोन्सालवीस :-**

त्याच्यामध्ये पुढच्या अटी आहे ते बघायला पाहिजे ना!

**गजानन भोईर :-**

इंग्रजीमधल्या अटींना मराठीत अनुवाद करायला साधारण किती वेळ लागेल?

**हॅरल बोर्जिस (प्र. सभापती) :-**

सन्मा. सदस्य भोईरजी ह्या सात अटी ज्या इंग्रजीमध्ये आहे त्याचे अनुवाद मराठीमध्ये ज्या सात अटी आहेत. ते त्याचे आहे आणि आठव्या अटीपासुन ज्या पुढच्या अटी आहेत त्या ॲडीशन आहेत.

**जोजफ घोन्सालवीस :-**

त्या सातच अटी आहेत का? त्या आपण आम्हाला मराठीत भाषांतर करुन ऑफिशियली द्या. हवे असल्यास एक दिवस सभा पुढे ठेवा.

**प्रभात पाटील :-**

अटीशर्तीचे वाचन करावे.

**रिटा शाह :-**

साहेब, हे सर्व मिक्सिंग आहे. मागची कॉपी आणुन टॅली करा.

**जोजफ घोन्सालवीस :-**

काय चालले आहे हे आम्हाला कळत नाही, कशाला वाचुन दाखवता जे ह्याच्यात बसतही नाही ते कशाला वाचुन दाखवता, काय करायचे आहे? नक्की तुम्हाला काय साधायचे आहे? पास करुन घ्यायचे असेल तर आमचा विरोध नोंदवा. आम्ही जातो.

**हॅरल बोर्जिस (प्र. सभापती) :-**

सन्मा. सदस्य अशा पद्धतीने जर करायचे असते तर आपण ज्या ज्या दुरुस्ती सुचविता ते आपल्यासमोर मांडले आहे. पुन्हा पुन्हा तेच सांगत आहे जे इंग्रजीमध्ये आहे तेच मराठी मध्ये अनुवाद करुन दिलेले आहे.

**रिटा शाह :-**

आपण बोलता ते मान्य आहे. आपण आम्हाला अभ्यास करायला वेळ द्या. गोषवारा आम्हाला आधीच द्यायला पाहिजे होता. काल जर गोषवारा दिला असता आज असा प्रश्न उभा राहिलाच नसता. आम्ही ते टॅली करुन आणले असते ना! सभेच्या वेळेस आपण आम्हाला पेपर देता.

(अटीशर्तीचे वाचन केले.)

**गजानन भोईर :-**

ह्या अटीशर्ती स्थायी समितीमध्ये घेण्याचा अधिकार आहे का? की हा धोरणात्मक निर्णय आहे आणि मा. महासभेने ठरवायला पाहिजे.

**हॅरल बोर्जिस (प्र. सभापती) :-**

सन्मा. सदस्य भोईर साहेब जकातीच्या बाबतीमध्ये ज्या अटीशर्ती मागच्या वेळेच्या होत्या. त्याच अटीशर्ती आता री - फॉरवर्ड केलेल्या आहेत. त्याच्यामध्ये जी ॲडीशन दुरुस्ती आपण सुचवितोय, शासनाच्या जी. आर. प्रमाणे ज्या मुळ अटीशर्ती आहेत. तिथे कुठेही बाधा आणत नाही. त्याच्यामध्ये ॲडीशनल स्थानिक परिस्थितीनुसार अधिक अटीशर्ती टाकण्याचा पुर्ण अधिकार आपल्याला आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ह्यामध्ये बरीचशी तफावत आहे. हे कायद्याच्या बाहेर नाही का? ही जी जकात चोरी करतील त्याला शिक्षा होईल असे.

**हॅरल बोर्जिस (प्र. सभापती) :-**

त्यांचा जो ठेका साईन होईल. त्यामध्ये ते सगळं येणार. ही निविदा ज्यांना भरायचीअसेल त्यांना ह्या अटीशर्ती लागू होतात. ज्यावेळेला त्यांचे महापालिकेशी कॉन्ट्रॅक्ट होईल त्यावेळी ते असणार आहे आणि याबाबतचा अधिक खुलासा उपायुक्त (मु.) करतील.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

आता आपण ज्याबाबत विचारणा केली, त्याबद्दल महाराष्ट्र शासनाची शासन निर्णय २८ फेब्रुवारी, १९९४ या ठिकाणी उपलब्ध आहे. त्याच्यामध्ये सगळी तरतुद आहे. त्या तरतुदीचे आपण जर अवलोकन केले तर विषयाची आपल्याला सगळी माहिती कळेल.

**गजानन भोईर :-**

मी अशी माहिती विचारतो, कल्याण-डोंबिवली मध्ये मनपाने असे केल्यानंतर राष्ट्रपतीकडुन चौकशी वगैरे आलेली आहे का?

**हॅरल बोर्जिस (प्र. सभापती) :-**

आमच्यापर्यंत अशी कोणतीही माहिती आलेली नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

माहिती करुन घ्या, माहिती आलेली आहे.

**अशोक पाटील :-**

सभागृहाला स्पष्ट करुन सांगावे.

**गजानन भोईर :-**

असा विषय कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत झाला होता का, आणि स्थायी समितीने मंजुर केल्यानंतर त्याची चौकशी वगैरे चालू आहे का?

**प्रभात पाटील :-**

कोणता विषय?

**गजानन भोईर :-**

हा विषय.

**प्रभात पाटील :-**

मला असे वाटते की, आतापर्यंत जकातीचा विषय हा स्थायी समितीमध्येच पास होतो, मा. महासभेमध्ये हा विषय होतच नाही. तसे असेल तर लेखापालकडे त्याबाबतची माहिती असायला पाहिजे.

**रिटा शाह :-**

जकातीचे अटीशर्ती ठरवायचे तो मा. महासभेचा अधिकार आहे की, स्थायी समितीचा अधिकार आहे?

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, आपण आम्हाला स्पष्टीकरण द्या की, हा जो विषय विषयपटलावर घेण्यांत आलेला आहे, मागच्या सभेचा तहकुब विषय. तर हा विषय सभापती साहेबांनी घेतला आहे की, प्रशासनाने घेतला आहे.

**हॅरल बोर्जिस (प्र. सभापती) :-**

सभापती साहेबांनी घेतला आहे.

**अशोक पाटील :-**

म्हणजे प्रशासनाकडुन विषय आलेला नाही.

**हॅरल बोर्जिस (प्र. सभापती) :-**

प्रशासनाकडुन नाही.

**अशोक पाटील :-**

प्रशासनाकडे विषय दिल्यांनतर प्रशासनाने काही टिपणी वगैरे दिलेली नाही.

**हॅरल बोर्जिस (प्र. सभापती) :-**

सभापती साहेबांनी विषय घेतल्यामुळे त्याच्या अटीशर्तीची आपल्याला प्रत दिलेली आहे. अन्यथा प्रशासनाकडुन विषय नाही.

**अशोक पाटील :-**

प्रशासनाने टिपणी देणे हे क्रमप्राप्त असते. मग तो कोणताही विषय असु दे. मा. स्थायी समितीचे सभागृह असो किंवा मा. महासभेचे सभा असु दे. स्थायी समितीमध्ये स्थायी समिती सभापतींचा अधिकार असतो आणि मा. महासभेमध्ये मा. महापौरांचा अधिकार असतो. विषयपटलावर कोणता विषय घ्यायचा हा त्यांचा अधिकार असतो. मग त्यांनी घेतलेल्या प्रत्येक विषयाची टिपणी किंवा गोषवारा हा प्रशासनाकडुन यायला पाहिजे, जरी तो निगेटिव्ह असु. प्रशासनाचे तांत्रिक किंवा कायदेशीर जे मत आहे. त्याची बाजु मांडणे हे आयुक्तांचे कर्तव्य आहे. कारण सभागृहामध्ये असणारे सगळे सदस्य हे कायद्याचे ज्ञात असतीलच अशातला भाग नाही. सर्व सदस्यांना कायदेशीर किंवा तांत्रिक बाबी माहिती

असेल अशातला भाग नाही. या संदर्भातील टिपणी प्रशासनाने प्रशासनाच्यावतीने आयुक्त साहेबांनी द्यायलाच हवी. भले ती त्यांच्या पद्धतीने द्यावी. पॉझिटिव्हली द्यावी किंवा निगेटिव्हली द्यावी. त्याच्या नंतर सभागृह काहीही ठराव करु शकेल. सभागृहामध्ये त्याच्या विषयी चर्चा होईल त्यांना योग्य वाटत असेल तर कायदेशीर गोष्टीची वाच्यता करणे जरुर आहे.

**प्रभात पाटील :-**

ह्या ज्या अटीशर्ती आमच्या समोर आलेल्या आहेत. त्या प्रशासनाकडुन आलेल्या नाहीत का?

**हॅरल बोर्जिस (प्र. सभापती) :-**

अधिक अटीशर्तीची जी प्रत दिलेली आहे. मागच्या वेळच्या अटीशर्ती कॅरी फॉरवर्ड आहेत. नविन अटीशर्ती ज्या आपण ॲड करतोय. हा विषय प्रशासनाकडुन नव्हता. ह्या विषयाबाबत सन्मा. सभापती साहेबांनी सभा बोलावली होती. ह्या ज्या अटीशर्ती आहेत त्या प्रशासनाकडुन नव्हत्या. (ॲडीशनल)

**प्रभात पाटील :-**

वरच्या ज्या सहा अटीशर्ती आहेत. त्या कॉमन आहे. आपण ज्या अटीशर्ती जास्तीचे नमुद केले आहे. त्यामुळे आपल्यातील एखाद्या सदस्याला वाटते की, त्याच्यामुळे आपल्याला त्रास होईल.

**रिटा शाह / जोजफ घोन्सालवीस :-**

त्रास होईल ना!

**प्रभात पाटील :-**

त्रास होईल अशी कोणती अट आहे?

**जोजफ घोन्सालवीस :-**

अशा प्रकारचे हक्क, कोणतीही रक्कम व नुकसान मागता येणार नाही. म्हणजे नुकसान भरपाई त्याला मागता येणार नाही.

**प्रभात पाटील :-**

बरोबर आहे. आपण त्याला कशाला नुकसान भरपाई द्यायची.

**जोजफ घोन्सालवीस :-**

तो नुकसानभरपाई मागायला कोर्टात जाऊ शकत नाही का?

**प्रभात पाटील :-**

कोर्टात जाऊ दे. पण आपण त्याला नुकसानभरपाई देणार नाही. त्याला हवे असल्यास तो कोर्टात जाईल.

**सुर्यकांत भोईर :-**

ठेकेदार ठेका घेताना आपल्या अटीशर्ती बघुन ठेका घेईल ना! अन्यथा तो ठेका कशाला घेईल. तो टेंडर भरणारच नाही.

**प्रभात पाटील :-**

अटीशर्ती जर ठेकेदाराला मान्य असतील तरच तो ठेका घेणार ना!

**हॅरल बोर्जिस (प्र. सभापती) :-**

फायनानशियली आपल्याला त्रास होऊ नये. म्हणुन अट घेतलेली आहे.

**अशोक पाटील :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईर ह्यांचे म्हणणे असे आहे की, कल्याण-डोंबिवलीमध्ये असा प्रकार झाला होता. ते त्यांच्या निर्दशनात आहे का?

**प्रभात पाटील :-**

मला असे म्हणायचे आहे की, प्रत्येक नगरपालिका, महानगरपालिका ह्या स्वायत्त संस्था आहेत. त्यांचे निर्णय हे त्यांनीच घ्यायचे असतात. आपण प्रत्येक वेळेला कायद्याच्या चौकटीत जाणार तर त्यांनी आपल्याला ही स्वायत्तता दिलीच कशाला? आपल्या स्वतःलाही आपली महापालिका कशी चालवायची, कसा कारभार करायचा याचा अधिकार आपल्यालाही आहे म्हणुन तर लोकांनी आपल्याला निवडुन दिले आहे.

**अशोक पाटील :-**

आपण सभागृह म्हणुन निर्णय घेऊ शकतो.

**गजानन भोईर :-**

असे मुंबई, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत असे चालले आहे.

**प्रभात पाटील :-**

कोणाचा अधिक बाऊ करण्याची आपल्याला गरज नाही.

**गजानन भोईर :-**

विषय फक्त असा आहे की, असे घडले आहे का?

**सुर्यकांत भोईर :-**

आपल्याला आपल्या महानगरपालिकेचे बघायचे आहे.

**प्रभात पाटील :-**

आपल्याला आपल्या महानगरपालिकेचे बघायचे आहे, आपली महानगरपालिका आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपली महानगरपालिका किती प्रॉफीटमध्ये आहे ते आपणच बघायचे आहे.

**हॅरल बोर्जिस (प्र. सभापती) :-**

सन्मा. सदस्य अशोक पाटील, शासनाचा १९९४ चा जो जी.आर. आहे, त्या जी.आर.चा पुर्णपणे अवलोकन करुन त्याला बंधनकारक राहुनच अटीशर्ती ॲडीशनल केलेल्या आहेत.

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, मला अटीशर्तीबद्दल काही अडचण नाही. पण माझे एवढेच म्हणणे की, प्रत्येकवेळी असेच चालते, स्थायी समितीमध्ये सभापती किंवा मा. महासभेमध्ये महापौर हे विषयपटलावर विषय घेतात आणि प्रशासन टाळाटाळ करते किंवा प्रशासन नरो वा कुंजारोवा भुमिका घेते. ते त्यांचे कर्तव्य असते.

**प्रभात पाटील :-**

असे नाही, आपल्यामध्ये प्रशासनाचे दोन सदस्य आहेत. पण बाकीचेही लोक आहेत.

**अशोक पाटील :-**

हे त्यांचे कर्तव्य असते आणि त्यांची ड्युटी असते की, एखादा विषय मा. सभापती सो., किंवा मा. महापौरांनी घेतला तर त्याच्यावर त्यांना जी योग्य-अयोग्य टिपणी वाटेल ती टिपणी त्यांनी देणे हे क्रमप्राप्त असते. म्हणजे सभासदांना एक दिशा कळेल की, ह्या विषयावर तांत्रिक बाब किंवा कायदेशीर बाब काय असते. त्यांचे ओपिनियन ही महत्त्वाचे असते. सभागृहाला जो निर्णय घ्यायचा आहे तो निर्णय ते घेतील. त्यांना जे योग्य वाटेल तोच निर्णय सभागृह घेईल, तो भाग वेगळा आहे. परंतु, प्रशासनाची ही जबाबदारी किंवा कर्तव्य असते. समजा एखादा ठराव तुम्ही आम्ही सभागृहामध्ये पास केला आणि ते जर आयुक्त साहेबांना अयोग्य वाटले तर ४५१ खाली ते विखंडीतसाठी शासनाकडे पाठवून देतात ते आपली पर्वा करत नाही. त्यांना जर ठराव अयोग्य वाटला तर विखंडीत करतात व योग्य वाटला तर त्यावर ते अंमलबजावणी करतात. आपण जरी चुकीचा ठराव पास केला किंवा सभागृहाने जरी चुकीचा निर्णय घेतला तरी तो योग्य की अयोग्य आहे ह्याची खातरजमा करणे हे आयुक्त साहेबांचे काम आहे आणि आयुक्त साहेबांना जर पटले की, सभागृहाने हा घेतलेला ठराव, निर्णय योग्य आहे, तर त्याची अंमलबजावणी करु शकतात. कारण आयुक्त साहेब हे आय.ए.एस. ऑफिसर असतात आणि त्यांना जर वाटले की, सभागृहाचा हा निर्णय योग्य आहे. त्याची अंमलबजावणी ते करु शकतात आणि तर अंमलबजावणी केली तर आपला ठराव योग्य आहे असे समजायला हरकत नाही. म्हणजे कायदेशीरदृष्ट्या आयुक्त साहेबांनी आपण घेतलेला कोणताही निर्णय, ठराव हा जरी अटीशर्तीचा ठराव पास केला. तो जर आुयक्त साहेबांना व त्यंना तो योग्य वाटला तर त्यची ते अंमलबजावणी करतील, त्याची संपुर्ण जबाबदारी त्यांच्यावर असणार. त्यांना जर अयोग्य वाटला तर ४५१ खाली विखंडीत करण्यासाठी शासनाकडे पाठवु शकतात. जसा त्यांनी कर्मचाऱ्यांचा ठराव पाठवलेला आहे. अशा बाबतीत प्रशासनाने आुयक्तांच्या वतीने त्यांचे ओपिनियन सांगावे आणि हा जो आताचा विषय आहे, हा आर्थिक बाबीशी निगडित असल्याकारणाने ह्याच्यावर लेखा परिक्षकाचे कायदेशीरदृष्ट्या ओपिनियन पाहिजे. त्यांचे देखील आम्हाला मार्गदर्शन हवे आहे.

**हॅरल बोर्जिस (प्र. सभापती) :-**

सन्मा. उपायुक्त (मु.) सो., शासनाच्या जी.आर.ला अधिन राहुन ह्या ज्या अटीशर्ती बनवल्या आहे त्याचे अवलोकन झाले की, नाही. त्याची आपण सभेला कल्पना द्यावी.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती साहेब मी असे विचारु इच्छितो की, जे विक्रीसाठी आणि खाण्यासाठी एवढ्या दोनच गोष्टीवर...

**प्रभात पाटील :-**

सन्मा. सदस्य मुळात असे आहे की, आपल्या अटीशर्ती व्यवस्थित आहे का, नंतर आपण अटीशतीवर बोलु या. प्रथम शासनाचा निर्णय येऊ दे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

महाराष्ट्र शासनाचा शासन आदेश क्र. एम.एम.ए.१०९४/प्रप्र-३/९४/नवि-३२, मंत्रालय, मुंबई, दि. २८ फेब्रुवारी १९९४ हा शासन निर्णय आहे आणि त्याचा सबसिक्वन्ट जो आहे, शासन निर्णय जी.एन.१०९४/प्र.क्र.१४३/नवि-१४, दि. ३ मार्च १९९५. ह्या दोन शासन निर्णयाचे अवलोकन होऊन ते वाचुन आपण पुढचा निर्णय घेऊ शकता. त्याचे सभागृहात वाचन करण्यांत यावे आणि त्याप्रमाणे निर्णय घ्यावे असे मला वाटते.

**प्रभात पाटील :-**

त्याच्यात काय निर्णय दिले आहे, त्याचे वाचन करावे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

हे सर्व गोषवाऱ्यासोबत जोडुन द्यायला पाहिजे होते.

**हॅरल बोर्जिस (प्र. सभापती) :-**

जी. आर. मध्ये अटीशर्तीचा जो उल्लेख केलेला आहे. त्याचे सचिव साहेब, सभागृहात वाचन करुन दाखवतील.

(प्र. सचिवांनी जी. आर. चे वाचन केले.)

निविदासाठी प्रसिद्ध करावयाची नोटीस :- निविदा, प्रपत्र, अटी व शर्ती करारनामा, बँक, गॅरेंटी, अधिकरण स्विकृती पत्र ह्याची अटी विहित नमुन्यासोबत जोडले आहे. विहित नमुन्यातील कोणत्याही बाबी, अटी व शर्ती बदलण्याचा अधिकार नगरपरिषदेला असणार नाही. मात्र स्थानिक परिस्थितीनुसार किंवा अनुभवावरुन मुळ अटीशर्तींना बाधा न येणारे बदल तसेच जादा अटीशर्ती समाविष्ट करता येईल.

**रिटा शाह :-**

आपण जी.आर. चे वाचन करुन सांगितले की, हे करता येईल हे सर्व आम्हला माहिती आहे. पण आम्ही सरळ एकच साधा प्रश्न विचारला आहे की, ह्या अटीशर्ती पास करण्याचा अधिकार स्थायी समितीला आहे का? हा धोरणात्मक निर्णय आहे. त्यामुळे मला असे वाटते की, ह्याची मा. महासभेला पॉवर आहे, आपल्याला पॉवर नाही. ते आपण क्लिअर करा.

**अशोक पाटील :-**

ह्या अटीशर्तीमध्ये आपण ॲडीशनल अटी सुचवतोय.

**रिटा शाह :-**

आपण ॲडीशनल अटी सुचवतोय हे बरोबर आहे. अट ॲडीशनल करायला आमची हरकत नाही. पण शिफारस करतो की, हे मा. महासभेसमोर जायला पाहिजे. कारण आपल्याकडे फुल ॲण्ड फायनल ऑथोरिटी आहे का? आम्हाला ह्याचा विरोध नाही. पण स्थायी समितीला असे फुल ॲण्ड फायनल अटीशर्ती करण्याचा अधिकार आहे का?

**गजानन भोईर :-**

हा धोरणात्मक निर्णय आहे.

**प्रभात पाटील :-**

ह्या अटीशर्ती शासनाच्याच आहेत.

**हॅरल बोर्जिस (प्र. सभापती) :-**

सन्मा. सदस्य असे करण्याचा उद्देश एकच आहे, मी तुम्हाला उदाहरण देतो, मालेगाव महानगरपालिकेमध्ये अशीच एक केस झाली होती, एका निविदाधाराने निविदा टाकुन तो पळून गेला आणि मागच्या वर्षीही आपल्याला एक वाईट अनुभव आला की, एका निविदाधारकाने कोरी निविदा टाकुन तो निघुन गेला. ह्या सगळ्या गोष्टी पुढे भविष्यात घडु नये म्हणुन ह्या अटीशर्ती टाकतोय.

**अशोक पाटील :-**

गेल्यावर्षी आपल्याकडे ही तसा प्रकार झालेला होता आणि त्याच्यामुळे कोर्ट मॅटर वगैरे झाले होते.

**हॅरल बोर्जिस (प्र. सभापती) :-**

ह्या सर्व गोष्टी पुन्हा पुन्हा घडु नये आणि आपल्याला कुठे अडचण येऊ नये म्हणुन हे सगळ ठरले आहे.

**अशोक पाटील :-**

असे करण्यासाठी स्थायी समितीला तशा पॉवर्स आहेत.

**जोजफ घोन्सालवीस :-**

तसा निर्णय मा. महासभेत घेतला होता.

**हॅरल बोर्जिस (प्र. सभापती) :-**

मा. महासभेला असा निर्णय झाला होता की, जकात लावावा की उपकर लावावा.

**रिटा शाह :-**

प्रशासन काहीही उत्तर देत नाही ह्याचा अर्थ काय ?

**जोजफ घोन्सालवीस :-**

हा विषय मा. महासभेतच जायला पाहिजे.

**अशोक पाटील :-**

स्थायी समिती जो ठराव करुन देईल तो ठराव आयुक्त साहेबांना जर निर्णय मान्य नसेल तर आयुक्त साहेब तो ठराव विखंडीत करु शकतात.

**प्रभात पाटील :-**

आपले अधिकार आपण कशाला डावलायचे? त्यांनी त्यांची कार्यवाही करायची.

**रिटा शाह :-**

आम्ही अधिकारही सोडायला तयार नाही. फक्त मागच्या वेळी मी ठराव करुन दिला, अनुमोदन दिले, त्या तीन अधिकाऱ्यांना पदोन्नतीबाबत ज्येष्ठता यादी ठरविणे. त्याचे काय झाले तर तो ४५१ खाली रद्द झाला. आम्ही तुम्हाला काहीही ठराव देऊ. म्हणुन मी सारखे सारखे विचारते की, प्रशासनाने उत्तर द्यायचे, ही प्रशासनाची बाब आहे.

**हॅरल बोर्जिस (प्र. सभापती) :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह मॅडमचा असा मुद्दा आहे की, आपल्याला अधिकार आहे की नाही? पण मॅडम मागच्या वेळेला जी सभा झाली. त्यावेळेला हा विषय प्रशासनाकडुन झालेला होता. परंतु साहेब त्यावेळेला आऊट ऑफ स्टेशन असल्यामुळे त्या विषयाचा गोषवारा आपल्याजवळ आला नव्हता. आपल्याला जर अधिकार नसते अटीशर्ती बनविण्याचे तर तो विषय प्रशासनाकडुन आपल्याकडे त्यावेळेलाच आला नसता.

**रिटा शाह :-**

मा. उपायुक्त (मुख्यालय) रणखांब साहेब आता बोलले की, हा विषय आमच्याकडुन आलेला नाही. तर आम्ही त्याच्यावर काय बोलु?

**प्रभात पाटील :-**

रणखांब साहेबांनी हे देखील सांगावे की, जर तुमच्याकडुन हा विषय आलेला नाही तर सभापती साहेबांना हे अधिकार आहेत की, नाही. स्थायी समितीला हे अधिकार आहेत की नाही. हा विषय विषयपटलावर आणण्याचा

**अशोक पाटील :-**

लिगल ओपिनियन द्या. आपल्याकडे कायदेशीर तज्ञ आहेत.

**प्रभात पाटील :-**

हरकत नाही. आपल्याकडुन विषय आला पाहिजे हे जरुरी नाही. आम्हाला हे माहिती आहे, स्थायी समिती ही महापालिकेचा आत्मा आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

विधी सल्लागाराने माहिती द्यावी.

**अशोक पाटील :-**

अन्यथा लेखा परिक्षकाने सांगावे.

**रिटा शाह :-**

स्थायी समितीमध्ये एकही अधिकारी उठुन बोलायला तयार नाही याचा अर्थ काय घ्यायचा.

**प्रभात पाटील :-**

आपण हा कुठलाही फायनानशियल निर्णय घेत नाही आहोत. फक्त सेवा नियम तयार करत आहोत आणि महापालिकेच्या स्थायी समितीला तेवढे नियम बनविण्याचे अधिकार नाहीत.

**गजानन भोईर :-**

ह्या विषयावर प्रशासन सहमत आहे की, नाही ते सांगावे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

कोणतीही अटीशर्ती बदलता येणार नाही. फक्त परिस्थितीनुसार तर अशी कुठली परिस्थिती आलेली आहे. ह्याचा निर्णय मा. महासभेत जाऊ दे.

**गजानन भोईर :-**

ह्या विषयाशी प्रशासन सहमत असेल.

**प्रभात पाटील :-**

प्रशासन असहमत का असेल. चुकीचे काहीच नाही. फक्त त्यांच्याकडुन हा विषय आला नाही म्हणजे आम्हाला विषय आणता येत नाही का?

**गजानन भोईर :-**

प्रशासन माहिती का देत नाही?

**हॅरल बोर्जिस (प्र. सभापती) :-**

सन्मा. सदस्य मागच्या जकातीच्यावेळी जो वाईट अनुभव आला तो प्रकार वारंवार घडु नये म्हणुन हे सगळं केलेले आहे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

हा विषय जो आलेला आहे, हा विषय शासन निर्णयाची सबसिपेड इतर ॲडीशनल अटीशर्ती करण्याबद्दलचा आहे. तो विषय आमच्यासमोर आलेला नाही. कुठल्या प्रकारच्या अटीशर्ती घ्यायच्या आहेत. त्याची आम्हाला आता माहिती मिळते. जर आम्हाला त्याची माहिती असती तर मी त्याची सविस्तर माहिती दिली असती. जोपर्यंत ह्याची पार्श्वभुमी ठरत नाही, बदल काय करणार आहे. हे माहिती नाही आणि आपण ही स्थायी समितीची बोलावली आहे. आणि आपण काय ठरवले आहे हे आम्हाला कळत नाही. तोपर्यंत आम्ही कसे उत्तर देणार?

**रिटा शाह :-**

प्रशासनाची काय अडचण आहे हे आम्हाला समजले. प्रशासनाकडुन हा विषय आलेला नाही व ह्याची कल्पनाही आपणाला नव्हती की, ह्यामध्ये काय अटीशर्ती मा. सभापती साहेबांनी स्थायी समितीपुढे सादर केलेल्या आहेत? मी फक्त असा प्रश्न विचारला की, कुठलेही धोरण, अटीशर्तीमध्ये शासन निर्णयाच्या अतिरिक्त जर आपल्याला काय वाढ करायची असेल तर हा धोरणात्मक निर्णय घेण्याचा स्थायी समितीला अधिकार आहे की, मा. महासभेला अधिकार आहे? त्याची माहिती द्या.

**अशोक पाटील :-**

याबाबत विधी सल्लागाराकडुन ओपिनियन घ्या.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सचिव साहेब, आपण सांगा. जे अटीशर्तीचे नमुने दिलेले आहेत. त्याच्यात बदल करता येईल का?

**प्र. सचिव :-**

विशिष्ट परिस्थिती आणि अनुभवावरुन बदल करता येईल.

**रिटा शाह :-**

बदल करता येईल की नाही ते नंतरचे पण आता आमचा अधिकार आहे की, नाही तेवढे सांगा.

**प्रभात पाटील :-**

शासन निर्णयामध्ये वाचले आहे. त्याच्यामध्ये आहे. आपल्याला पुर्ण अधिकार आहे.

**रिटा शाह :-**

प्रशासनाने हे उत्तर आम्हाला माईकवर द्या. आम्हाला ते पटतं, त्यांनी जे उत्तर दिले तेच उत्तर त्यांनी माईक वरुन द्या की, स्थायी समितीला अधिकार आहे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

मी आपल्याला ह्याचे उत्तर दिलेले आहे.

**रिटा शाह :-**

आपण आम्हाला आता काय उत्तर दिले की, प्रशासनाकडे आलेले नाही. म्हणुन आम्ही तुम्हाला उत्तर देऊ शकत नाही असे आपण उत्तर दिले आहे. असे उत्तर नाही दिले की ह्या अटीशर्तीमध्ये वाढ करायची किंवा कमी करायचे किंवा त्याच्यामध्ये फेरबदल करण्याचा अधिकार स्थायी समितीला आहे. एवढे उत्तर द्या.

**हॅरल बोर्जिस (प्र. सभापती) :-**

जी. आर. मध्ये स्पष्ट दिलेले आहे. सन्मा. सदस्य दहा मिनिटाकरीता सभा तहकुब करण्यांत येत आहे.

**सभा तहकुब झाल्याची वेळ :- दु. १२.१० वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**